पुण्य नगरी

# मोबाईलचा गरजेपुरताच वापर करणे आवश्यक – पांगे

**उमरगा :** शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात मोबाईलचा वापर सुरू आहे. आपल्या शैक्षणिक विकासापेक्षा मोबाईल वापराकडे विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे. मोबाईलच्या अती वापरामुळे आपल्या जगण्यावर विपरीत परिणाम होत आहे. मोबाईलचा गरजे पुरताच वापर करा. आपल्या जीवाभावाच्या नातेवाईकांशी प्रत्यक्ष संवाद साधून नात्यातील जवळीकता अधिक सक्षम करा. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या अती वापरापासून स्वतःला दूर ठेवावे असे आवाहन व्याख्यात्या प्रतिक्षा पांगे यांनी केले.

आदर्श महाविद्यालय उमरगा, क्वीक हिल फाऊंडेशन व राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने



आदर्श महाविद्यालयात हिंदी दिना निमित्त सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर प्रतिक्षा पांगे यांचे व्याख्यान झाले. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. सुरेश कुलकर्णी, प्रा. डॉ. राम सोलंकर, प्रा. डॉ. अनुराधा मिरगणे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना पांगे म्हणाल्या, आजची तरुणाई मोबाईलच्या अति वापरामुळे स्वतःचे अस्तित्व विसरत चालली आहे. मोबाईलमध्ये फसवणुकीच्या प्रमाणात दिवसेंदिवस मोठी वाढ होत आहे. आपला ओटीपी कधी अनोळखी व्यक्तींना सांगू नका. फेक लिंकला कधीही क्लीक करु नका. फेसबुक, व्हॉट्स ॲप, इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट या सोशल मीडियाच्या वापरापासून १८ वर्षाच्या आतील मुलांमुलीना दूर ठेवा. ऑनलाईन गेमच्या व्यसनामुळे अनेक मुलांना आपले नाहक प्राण गमवावे लागले आहेत. अनाधिकृत वेबसाईटच्या फसवणुकीपासून दूर रहा.

Osmanabad Edition Edition
Sep 17, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com